विद्यमान शासकीय तंत्रनिकेतनांमध्ये अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी दुसरी पाळी सुरू करणे.

सन २०१७-१८ करिता निधी वितरण.

महाराष्ट्र शासन
अल्पसंख्याक विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः तंत्रनि-२०१७/प्र.क्र.४५/का.८

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : २२ मार्च, २०१८.

वाचा -

१) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक: टिईडी-२०१० /(३३४/२००९)/तांशि-५, दि. १३ सप्टेंबर, २०११.
२) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक: टिईडी-२०११/(३४७/२०११)/तांशि-५, दि. १९ जुलै, २०१२.
३) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक: मान्यता-२०१४/प्र.क्र.७०/तांशि-५, दि. ८ जुलै, २०१४
४) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक: अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८ एप्रिल, २०१७.
५) अल्पसंख्याक विकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक: अविवि-२०१७/प्र.क्र.३१/ का.७, दि.१९ एप्रिल, २०१७.
६) अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक: तंत्रनि-२०१७/प्र.क्र.४५/ का.८, दि.२९ मे, २०१७.
७) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक : अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दि.३० जून, २०१७.
८) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक : अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.६ फेब्रुवारी, २०१८.
९) सह संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, मुंबई यांचे पत्र क्र.९/नियोजन/अ.सं.व्दि.पा/२०१८/३४१, दि.३० जानेवारी, २०१८ व सह संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, मुंबई यांचे पत्र क्र.९/ नियोजन/अ.सं.व्दि.पा/२०१८/३८४, दि.१५ मार्च, २०१८ .

प्रस्तावना :-

संदर्भ क्रमांक १ येथील शासन निर्णय अन्वये सन २०११-१२ पासून ठाणे, सोलापूर, जळगाव, नांदेड, यवतमाळ, मुंबई शहर व मुंबई उपनगर या ७, संदर्भ क्रमांक २ येथील शासन निर्णय अन्वये सन २०१२-१३ पासून रत्नागिरी, कराड, ब्रम्हपुरी, जालना, अंबड या ५ व संदर्भ क्रमांक ३ येथील शासन निर्णय अन्वये सन २०१४-१५ पासून पुणे, लातूर, हिंगोली या ३ अशा एकूण १५ ठिकाणच्या

शासकीय तंत्रनिकेतनांमध्ये अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी दुसरी पाळी सुरू करण्यात आली आहे. त्यानुसार " मागणी क्रमांक झेड ई-१, २२३५ सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२ समाजकल्याण, २००- इतर कार्यकम, राज्य योजनांतर्गत योजना, (०१) (३०) अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी विद्यमान शासकीय तंत्रनिकेतनांमध्ये दुसरी पाळी सुरू करणे, (२२३५ बी ०२२)" या लेखाशीर्षाखाली सन २०१७-१८ करिता वेतन व इतर उद्दिष्टांकरिता रु.९.०० कोटी इतकी तरतूद अर्थसंकल्पीत करण्यात आली आहे. वित्त विभागाच्या संदर्भ क्र.४ च्या परिपत्रकास अनुसरून संदर्भ क्र. ६ च्या शासन निर्णयान्वये रू.१,५६,००,०००/- (अक्षरी रू.एक कोटी छपन्न लाख फक्त) निधी वितरित करण्यात आला आहे. वेतन उद्दिष्टावर सन २०१७-१८ चा संचालनालयाचा प्रत्यक्ष खर्च पाहता सुधारित अंदाज रू.८,६७,३९,०००/- (अक्षरी रू.आठ कोटी सदुसष्ट लाख एकोणचाळीस हजार फक्त) करण्यात आला आहे. वित्त विभागाच्या संदर्भ क्र.४ च्या परिपत्रकास अनुसरून संदर्भ क्र.६ च्या शासन निर्णयान्वये वितरित रू.१,५६,००,०००/- (अक्षरी रू.एक कोटी छपन्न लाख फक्त) वजा करता वेतन या बाबीवर रू.७,११,३९,०००/-(अक्षरी रू.सात कोटी अकरा लाख एकोणचाळीस हजार फक्त) निधी तसेच इतर उद्दिष्टांवर एकूण रू.२,५२,००,०००/- (अक्षरी रू.दोन कोटी बावन्न लाख फक्त) असा एकूण रू.९,६३,३९,०००/-(अक्षरी रू.नऊ कोटी त्रेसष्ट लाख एकोणचाळीस हजार फक्त) शिल्लक आहे. संदर्भ क्र.९ च्या पत्रांन्वये सह संचालक/ उप संचालक , तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांनी उर्वरित निधी वितरीत करण्याची मागणी केलेली आहे. वित्त विभागाचे संदर्भ क्र.८ चे शासन परिपत्रक व सन २०१७-१८ चे सुधारित अंदाजानुसार निधी वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

विद्यमान शासकीय तंत्रनिकेतनामध्ये अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी १५ शासकीय तंत्रनिकेतनांमध्ये अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी दुसरी पाळीवरील खर्च भागविण्यासाठी वित्त विभागाच्या संदर्भ क्र.८ चे परिपत्रक व व सन २०१७-१८ चे सुधारित अंदाजानुसार सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता आवश्यक असणारा अनिवार्य कार्यक्रमावरील खर्चाकरिता रू.९,६३,३९,०००/- (अक्षरी रू.नऊ कोटी त्रेसष्ट लाख एकोणचाळीस हजार फक्त) खालीलप्रमाणे वितरीत करण्यास याव्दारे शासन मान्यता देण्यात येत आहे :-

अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी विद्यमान शासकीय तंत्रनिकेतनांमध्ये दुसरी पाळी सुरू करणे (२२३५ बी ०२२)	**सन २०१७-१८ साठी अर्थसंकल्पित करण्यात आलेले अनुदान**	**सन २०१७-१८ च्या सुधारित अंदाजपत्रकास अनुसरून उपलब्ध निधी**	**शासन निर्णय दि.२९ मे, २०१७ अन्वये वितरीत निधी**	**सन २०१७-१८ करिता वितरित करावयाचा निधी**
०१, वेतन	५,८५,००,०००/-	८,६७,३९,०००/-	१,५६,००,०००/-	७,११,३९,०००/-
२१, पुरवठा व सामुग्री	५,००,०००/-	४,००,०००/-	-	४,००,०००/-
२८, व्यावसायिक सेवा	३,००,००,०००/-	२,४०,००,०००/-	-	२,४०,००,०००/-
५२, यंत्रसामुग्री व साधनसामुग्री	१०,००,०००/-	८,००,०००/-	-	८,००,०००/-
एकूण	**९,००,००,०००/-**	**११,१९,३९,०००/-**	**१,५६,००,०००/-**	**९,६३,३९,०००/-**

२. सदर तरतूद संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडे सुपूर्द करण्यात येत असून याकरिता ते “नियंत्रक अधिकारी” आणि त्यांनी प्राधिकृत केलेले दुय्यम अधिकारी “आहरण व संवितरण अधिकारी” म्हणून काम पाहतील.

३. या योजनेअतंर्गत अल्पसंख्याक समाजातील विदयार्थ्यांना प्रवेश देण्यात येऊन त्याचा तपशील वेळोवेळी अल्पसंख्याक विकास विभागास सादर करावा. तसेच सदर अनुदान ज्या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आले आहे त्याच प्रयोजनासाठी खर्च करण्यात यावे व खर्च मंजूर केलेल्या निधीच्या मर्यादेत ठेवण्यात यावा तसेच केलेल्या खर्चाचा तपशील व उपयोगिता प्रमाणपत्र (Utilization Certificate) संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी विहित मुदतीत शासनास आणि महालेखापाल कार्यालयास सादर करण्याची जबाबदारी राहील.

४. सदर रक्कम वितरीत करण्यापूर्वी संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय मुंबई यांनी शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णय/ कार्यालयीन आदेश/ वित्तीय नियमावली / सार्वजनिक बांधकाम विभागाची कार्यनियमावली/ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचे निरिक्षण अहवाल/वित्तीय कार्यपध्दती आणि वित्त विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या संदर्भाधीन सूचना यांचा अवलंब करावा.

५. “सदर शासन निर्णय वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८ भाग पहिला, वित्त विभाग, शासन निर्णय क्र. विअप्र २०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, दि. १७ एप्रिल, २०१५ अन्वये प्रशासकीय विभागास प्राप्त झालेल्या अधिकारांतर्गत किंवा त्या त्या विभागास वेळोवेळी वित्तीय अधिकार नियम पुस्तिका भाग-२ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार तसेच शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/ अर्थ-३, दि. १८ एप्रिल, २०१७ मधील परिच्छेद ७ ते १८ येथील अटींची व त्यासोबतच्या परिशिष्टांमधील अ.क्र. ३ व ९ मधील अटींची तसेच वित्त विभागाच्या दि.३० जून, २०१७ व दि.६ फेब्रुवारी, २०१८ च्या परिपत्रकातील अटींची पुर्तता होत असून प्राप्त मान्यतेस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.”

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३२२१३४४१६९११४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Samir Ramesh Salunkhe

Digitally signed by Samir Ramesh Salunkhe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Minorities Development, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ba9951375d8539e02179fc093b36c7c7d7a866fc20f129ea0ff67bbde52fa539, cn=Samir Ramesh Salunkhe
Date: 2018.03.22 13:46:42 +05'30'

(समीर साळुंखे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) महालेखापाल, (लेखा परिक्षा) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर
२) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर
३) प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,
४) संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई ,

५) प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतने, ठाणे, सोलापूर, जळगाव, नांदेड, यवतमाळ, मुंबई शहर, मुंबई उपनगर, रत्नागिरी, जालना, अंबड, ब्रम्हपूरी, कराड, पुणे, हिंगोली व लातूर. (संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेमार्फत)

६) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,

७) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,

८) नियोजन विभाग का. १४७५,

९) वित्त विभाग, व्यय-४/ अर्थ-३ व १४,

१०) अवर सचिव (का.७), अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना विनंती करण्यात येते की, कृपया सदर निधी B.D.S. वर तात्काळ उपलब्ध करुन द्यावा.

११) निवडनस्ती.